# पोलीस स्टेशन अमडापुर

अमडापुर येथील अमर विद्यालय येथे नवीन कायदे भारतीय न्याय संहिता-2023, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता- 2023 आणि भारतीय साक्ष अधिनियम-2023 यातील कायदेशीर तरतुदी, I.T. Act मधील तरतुदी, तसेच सोशल मीडियाचा काळजीपूर्वक वापर व महिला संबंधी घडणारे अपराधा संबंधाने घ्यावयाची दक्षतेबाबत , तसेच पोक्सो कायद्या अंतर्गत सूचना देऊन विदयार्थ्यांची जागृती करण्यात आली. सध्या समाजामध्ये सोशल मीडिया व इतर प्रसार माध्यमांद्वारे सुरू असलेल्या अराजकते बाबत सतर्क राहून आपणाकडून कायद्याचे कुठलेही उल्लंघन होणार नाही व अशा घटनांपासून स्वत:चा बचाव कसा करावा पोलिसांची व विधी सल्लागार यांची मदत कशी घ्यावी व कायदेशीर मार्गदर्शन कसे प्राप्त करावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सदर जनजागृती Adv. देशमुख साहेब, Adv. आंभोरे साहेब व आम्ही स्वतः हजर राहून कार्यशाळा राबविण्यात आली. सदर मार्गदर्शन कार्यशाळेला अमर विद्यालय येथील विद्यार्थी तसेच पोलीस पाटील, सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामपंचायत सदस्य, शांतता समिती सदस्य, गावातील नागरिक यांना सदर कार्यक्रमात गावातील प्रतिष्ठित व्यक्ती 60 ते 70 लोक उपस्थित होते.




स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०